# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ३०/०३/२०२२ (बुधवार)**

**(दुपार)**

---

### अकस्मात मृत्यू

१) पो.स्टे. वेलतुर :– अंतर्गत २५ कि.मी. अंतरावरील मौजा देवळी कला येथे दिनांक २९/०३/२०२२ चे १४:०० ते १४:३० वा. दरम्यान फिर्यादी बंडु तुळशिराम रामटेके (पोलीस पाटील), वय ४७ वर्ष, रा.देवळी कला, ता.कुही, जि.नागपूर हे घरी हजर असतांना त्यांचे गावातील सुखदेव बाबुराव आदोडे, वय ्.६५ वर्ष यांनी दुपारी ०३.०० वाजताचे सुमारास पोलीस पाटील यांना माहिती दिली की, 'मला गावातील शेषराव दादाजी उरकुडे यांची पत्नी नामे **सौ.सपना शेषराव उरकुडे वय २५ वर्ष, रा. देवळी कला, ता.कुही** ही गावातील सुरज रामचंद्र रंगारी यांचे शेतातील विहिरीमध्ये अर्ध्या तासापुर्वी उडी घेतांना दिसली. अशी माहिती मिळताच तक्रारदार यांनी सुरज रामचंद्र रंगारी यांचे शेतात जावुन विहीरीत पाहणी केली असता, विहिरीमध्ये अवस्थेत सौ.सपना शेषराव उरकुडे यांचे प्रेत तरंगतांना दिसले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. वेलतुर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सपोनि श्री नितेश डोर्लीकर वेलतुर मो.क्र. ८८८८२९१२३४ हे करीत आहे.

२) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत २० कि.मी. अंतरावरील मौजा राऊळगाव स्वताचे घरी येथे दिनांक २२/०३/२०२२ चे १०:०० वा. दरम्यान **सुरेश शामराव सिंगुरकर, वय ५५ वर्ष, रा.राऊळगाव त.काटोल** हा दारू पिण्याच्या सवईचा असुन दारूच्या नशेमध्ये त्यांने आपले राहते घरी विषारी औषध प्राषन केली. त्याची प्रकृती खराब झाल्याने त्यास उपचाराकरीता ग्रामीण रूग्णालय कळमेश्वर व नंतर मेयो हॉस्पीटल नागपूर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दि. २९/०३/२०२२ चे १७.०६ वा. डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले.

सदर प्रकरणी सरतर्फे सफौ पाठक यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार कामठी हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर